दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ३ रे अंक ३०४ वा बुधवार दि.१५ मे २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## लोकांच्या आस्थेचा सकारात्मक वापर करा

नवी दिल्ली : पतंजली आयुर्वेदच्या दिशाभूल करणा-या जाहिरातीवरून सर्वोच्च न्यायालयाने कडक भूमिका घेतली आहे. यापूर्वीच्या सुनावणीत योगगुरू बाबा रामदेव यांच्याबरोबरच पतंजली आयुर्वेदचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बाळकृष्ण यांच्याविरोधात आज, मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने बाबा रामदेव यांचे कौतुक करतानाच कानउघाडणीही केली.



न्यायमूर्ती हीमा कोहली आणि न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्लाह यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. बाबा रामदेव, आचार्य बाळकृष्ण आणि इतरांविरोधातील अवमान याचिकेवरील खटला चालवायचा की नाही, याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने राखून ठेवला आहे. आज, मंगळवारी बाबा रामदेव न्यायालयात दाखल झाल्यावर न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्लाह यांना प्रणाम केला. त्यावर उत्तर देताना न्यायमूर्ती अमानुल्लाह म्हणाले, 'आमचाही प्रणाम.' या प्रकरणाच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने सूट दिल्याने योगगुरू बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांना दिलासा मिळाला आहे.

ज्या औषधांचे परवाने सस्पेंड करण्यात आले आहेत, त्यांची दुकानातील विक्री थांबविण्यासाठी तसेच ती औषधे घेण्यासाठी त्यांनी कोणती पावले उचलली आहेत, याबद्दल प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने यासाठी तीन आठवड्यांची मुदत दिली आहे. लोकांनी सतर्क राहिले पाहिजे, एवढाच आमचा उद्देश आहे, असे सांगतानाच सर्वोच्च न्यायालयाने, बाबा रामदेव यांनीही जगभरात योगाचा प्रसार करण्यात योगदान दिले आहे. बाबा रामदेव यांच्यावर लोकांची आस्था आहे. त्यांनी त्यांचा सकारात्मक वापर केला पाहिजे, अशी कानउघाडणीही केली.

इंडियन मेडिकल असोसिएशनने नोव्हेंबर २०२३ मध्ये पतंजली आयुर्वेदविरोधात केस दाखल केली होती. ॲलोपॅथी डॉक्टरांविरोधात जाणूनबुजून चुकीचे दावे पतंजलीने आपल्या जाहिरातींमध्ये केले, असा आरोप आयएमएने केला आहे. याबाबत, पतंजलीने तात्काळ सर्व जाहिराती थांबवाव्यात, असे आदेश न्यायालयाने फेब्रुवारीमध्ये दिले होते.

## ईशान्य मुंबईत विकासाचे मुद्दे भरकटले

मुंबई : प्रतिनिधी मुंबईतील लोकसभा निवडणूक मतदानासाठी अवघे सहा दिवस शिल्लक असल्याने उमेदवारांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. उत्तर-पूर्व मुंबई (ईशान्य मुंबई) लोकसभा मतदारसंघात प्रचार करतानाच महायुतीचे उमेदवार मिहीर कोटेचा आणि महाविकास आघाडीचे उमेदवार संजय दिना पाटील यांच्यात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. सुरुवातीला विकासाच्या मुद्यावर बोलले जात होते. परंतु आता या मतदारसंघातील प्रचार मुद्यावरून गुद्यावर पोहोचला आहे. मराठी विरुद्ध गुजराती, डम्पिगं ग्राऊंड, मानखुर्द-शिवाजीनगर ड्रग्जमुक्त, मुलुंडमध्ये धारावी पुनर्वसन आदी मुद्यांवरून आरोप-प्रत्यारोप रंगले आहेत.घाटकोपर पश्चिममधील समर्पण नामक एका गुजरातीबहुल सोसायटीतील रहिवासी भाजपचे स्थानिक पदाधिकारी आम्ही भाजपला मत देऊ, असे सांगत ठाकरे गटाच्या शिवसेना कार्यकर्त्यांना सोसायटीत प्रचारपत्रक वाटण्यास मनाई केली. यावरून महाविकास आघाडी उमेदवार संजय पाटील यांनी या मतदारसंघात मराठी विरुद्ध गुजराती असा वाद भाजपकडून निर्माण केला जात आहे, असा आरोप केला. तसेच यासंबंधी निवडणूक आयुक्त आणि मुंबई पोलिस आयुक्तांकडे तक्रार दिली. त्यावर माझे विरोधकच मराठी-गुजरातीला निवडणुकीचा मुद्दा बनवत असल्याचे सांगून त्यांना विकासावर बोलायचे नसल्याचे महायुतीचे उमेदवार मिहीर कोटेचा यांनी स्पष्ट केले.महायुतीचे उमेदवार कोटेचा यांची मानखुर्द-शिवाजीनगरमध्ये प्रचारयात्रा सुरू असतानाच दगडफेक करण्यात आली होती. यावरूनही आरोप-प्रत्यारोप झाले. महाविकास आघाडीचे उमेदवार संजय दिना पाटील यांच्या गुंडांनी प्रचाररथावर दगडफेक करून नुकसान पोहोचवल्याचा आरोप केला. हे आरोप फेटाळून लावत सरकार तुमचेच असून पोलिस बंदोबस्तात घेऊन प्रचार करा, असा सल्ला पाटील यांनी दिला. तसेच गोवंडी, शिवाजीनगर, मानखुर्द ड्रग्जचा अड्डा झाला असून हा परिसर ड्रग्जमक्त करणार असल्याचेही कोटेचा यांनी स्पष्ट केले.



## अमेठी, रायबरेलीत काँग्रेसला सपाची साथ

अमेठी : उत्तर प्रदेशमधील अमेठी आणि रायबरेली लोकसभा मतदारसंघातील लढत ही काँग्रेससाठी प्रतिष्ठेचा विषय बनली आहे. त्यातही रायबरेलीमधून यावेळी राहुल गांधी हे निवडणूक लढवत असल्याने या जागेचे महत्त्व आणखीनच वाढले आहे. मात्र या दोन्ही मतदारसंघातील समिकरणे पाहता येथे विजयासाठी काँग्रेसला समाजवादी पक्षाच्या मदतीवर अवलंबून राहणार आहे. त्यात उत्तर प्रदेशात इंडिया आघाडीच्या माध्यमातून काँग्रेस आणि सपा हे एकत्र आलेले असल्याने काँग्रेसला दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना महत्त्वाचे आदेश दिले आहेत. उत्तर प्रदेशमधील ज्या १७ जागांवर मित्रपक्ष निवडणूक लढवत आहे, तिथे आपलाच पक्ष मैदानात असल्यासारखे समजून काम करा, अशा सूचना अखिलेश यादव यांनी दिल्या आहेत. दरम्यान, अमेठी आणि रायबरेलीमधील सभांमध्ये लाल टोपी घातलेल्या समाजवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या मोठ्या प्रमाणात असलेल्या उपस्थितीमुळे अखिलेश यादव यांच्या आवाहनाचा सकारात्मक परिणाम होताना दिसत आहे.



यापूर्वी २०१७ मध्ये विधानसभा निवडणुकीत समाजवादी पार्टी आणि काँग्रेसमध्ये आघाडी झाली होती. मात्र त्यावेळी या आघाडीचा दारुण पराभव झाला होता. मात्र अमेठी आणि रायबरेलीमध्ये काँग्रेसच्या उमेदवारांच्या विजयासाठी दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते एकत्रितपणे प्रयत्न करत आहेत. काँग्रेसने रायबरेली लोकसभा मतदारसंघातून राहुल गांधी यांना तर अमेठी येथून के. एल. शर्मा यांना उमेदवारी दिली आहे.

अमेठी आणि रायबरेलीमध्ये काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी यांनी प्रचार अभियानाचे नेतृत्व आपल्याकडे ठेवले आहे. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक सभेमध्ये काँग्रेसच्या कार्यकर्त्यांसोबतच समाजवादी पक्षाचे स्थानिक नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने दिसत आहेत. २०१७ च्या विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवासाठी दोन्ही पक्षांमधील आघाडी ही केवळ कागदावरच राहणे कारणीभूत ठरले होते,

## जागजी येथील महिलेचा दुचाकीवरून पडून मृत्यू

धाराशिव : प्रतिनिधी तालुक्यातील जागजी येथील एका ३४ वर्षीय महिलेचा दुचाकीवरून पडून मृत्यू झाला. हा अपघात दि. ११ मे रोजी मेंढा ता. धाराशिव येथील तांड्याजवळ झाला. या प्रकरणी बेंबळी पोलीस ठाणे येथे दि. १३ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांनी सांगितले की, जागजी ता. धाराशिव येथील चांगदेव राजेंद्र हाटकर व त्यांच्या सोबत मयत सुवर्णा सुनिल हाटकर (वय ३४ वर्षे) हे दोघे दि. ११ मे रोजी रात्री पावणेनऊच्या सुमारास दुचाकीवरून जात होते. पाडोळी आ. येथून ट्रॅव्हल्सने पुणे येथे जाण्यासाठी जाताना मेंढा येथील तांड्याजवळ आल्यानंतर त्यांच्या दुचाकीला अपघात झाला.औसा ते धाराशिव रोडवर आरोपी चांगदेव हाटकर यांनी त्यांच्या ताब्यातील दुचाकी ही हायगई व निष्काळजीपणे चालविल्याने दुचाकी खड्ड्यात आदळली. दुचाकीवर पाठीमागे बसलेल्या सुवर्णा हाटकर या खाली पडून गंभीर जखमी झाल्या. त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी सुनिल बाबासाहेब हाटकर यांनी दि.१३ मे रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पोलिस ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## मंगरूळ येथील एकाचा काक्रंबा येथे अपघाती मृत्यू

धाराशिव : प्रतिनिधी मंगरूळ ता. तुळजापूर येथील यासिन मुलानी यांचा काक्रंबा येथे अपघाती मृत्यू झाला. हा अपघात दि. १० मे रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडला. या प्रकरणी वाहन चालकाच्या विरोधात तुळजापूर पोलीस ठाणे येथे दि. १३ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले की, तुळजापूर




तालुक्यातील मंगरूळ येथील मयत यासिन महेबुब मुलानी हे दि.१० मे रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास काक्रंबा गावातील जयभवानी धाब्यासमोर रोडवरुन पायी जात होते. दरम्यान टाटा कंपनीच्या ट्रेलरचा चालक आरोपी फैजान इकरान खान रा. रहिमाकुली जि. प्रतापगड राज्य उत्तरप्रदेश यांनी धडक दिली.

त्याच्या ताब्यातील टाटा ट्रेलर हा हायगई व निष्काळजीपणे चालवून यासिन मुलानी यांना पाठीमागून धडक दिली. या अपघातात यासिन मुलानी हे गंभीर जखमी होवून मयत झाले. वाहन चालक हा जखमीस उपचार कामी दवाखान्यात घेवून न जाता व अपघाताची माहिती न देता पसार झाला. या प्रकरणी आसमा सादिक वाडकर रा. ताकविकी ता. धाराशिव यांनी दि.१३ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## काशीमध्ये मोदींचे मराठमोळे स्वागत

काशी : लोकसभा निवडणुकीच्या अखेरच्या टप्प्याला सुरुवात होत असताना काशी-वाराणसी येथे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या रोड शोचे आयोजन करण्यात आले होते. या रोड शोसाठी मोठ्या प्रमाणात लोकांची गर्दी झाली होती. इतकेच नाही तर काशी वाराणसीतील मराठी समाजानेही पंतप्रधान नरेंद्र मोदींचे मराठमोळं स्वागत करत आपण सगळे मोदींच्या पाठीशी असल्याचे ठामपणे सांगितले.



गेली १० वर्ष आमचे खासदार राहिलेले नरेंद्र मोदी यांनी अतिशय चांगले काम केले असून इथली रुपरेखा त्यांनी बदलून टाकली आहे. गेल्या २-४ पिढ्यापासून आम्ही येथे राहत आहोत. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक काशीतील ब्राह्मणांनी केला होता. काशीतील ८० पैकी ६५ घाट हे मराठी समाजाने बांधलेले आहेत. काशीत मराठी समाज मोठ्या प्रमाणात आहे असे इथले रहिवासी संतोष पाटील यांनी म्हटले.

## कोणता मुद्दा घेऊन मतदान केले भाऊ

कळंब : अठराव्या लोकसभेची निवडणूक अंतिम टप्प्यात आहे. महाराष्ट्रात उन्हाबरोबर राजकीय वातावरण तापले. आरोप-प्रत्यारोप, चिखलफेक, वैयक्तिक हेवेदावे यावर मतदारांचे निखळ मनोरंजन झाले. तिस-यांदा पंतप्रधान होण्याची आस लागलेले नरेंद्र मोदी यांनी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात सभा (कॉर्नर) घेतल्या. मोदी यांना महाराष्ट्र हाबाडा देणार की कायया भीतीने ते लक्ष ठेवून आहेत.

ही निवडणूक नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी यांच्यात होत असल्याचे, प्रत्येक पक्षाने सांगितल्याने ग्रामीण भागात मात्र ही निवडणूक, 'कुठल्या मुद्यावर झाली रे भाऊ' याबाबत खुली चर्चा होऊ लागली आहे. पक्ष फोडणे, गटबाजी, पुतण्यांनी काकापासून घेतलेला घटस्फोट, शिवसेना, राष्ट्रवादी कोणाची, वयोमर्यादा या मुद्याने निवडणुकीत रंगत आणली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही राज्यातील प्रादेशिक पक्षाला डिवचले, त्यामुळे शरद पवार, उद्धव ठाकरे, नाना पटोले यांनी एकेरी भाषेत चिखलफेक केली. विकासासाठी काय करणार, हे मुद्दे विरोधकांकडेही नसल्याने, त्यांनीही विकास सोडून घराणेशाही, फोडाफोडीचे राजकारण



यावर टीकास्त्र सोडले. विकास काय केला आणि पुढे काय करणार यावर जास्त चर्चा झालीच नाही पण प्रत्येक घरात उमेदवारांनी चिन्ह पोचवण्याचा प्रयत्न केला व मीच कसा योग्य आहे हे ठासून सांगितले. राज्यात बहुतांश भागात वंचितचा फारसा परिणाम जाणवला नाही. या निवडणुकीत कोणत्याच पक्षाने ग्रामीण भागातील प्रश्न सोडवण्याचे ठोस आश्वासन दिले नसल्याने, मतदार आपण कोणता मुद्दा घेऊन मतदान केले हे कळेना. असे म्हणताना दिसत आहेत.

## पानवाडी येथे युवकाला मारहाण, १२ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल

धाराशिव : प्रतिनिधी धाराशिव तालुक्यातील पानवाडी येथे नारळाच्या झाडाची फांदी का तोडत नाही, या कारणावरून १३ जणांनी एका युवकाला व त्याच्या आई-वडीलांना मारहाण केली. ही घटना दि. ११ मे रोजी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी जखमी युवक अक्षय माने यांनी जिल्हा रूग्णालयात उपचार दरन्यान दिलेल्या जबाबावरून ढोकी पोलीस ठाणे येथे दि. १३ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांनी सांगितले की, पानवाडी येथील गणेश रंगनाथ मोरे व अक्षय दत्तात्रय माने यांच्या कुटुंबामध्ये नारळाच्या झाडाची फांदी तोडण्यावरून व जागेच्या कारणावरून जुना वाद आहे. दि. ११ मे रोजी हा वाद उफाळून आला. पानवाडी येथील आरोपी गणेश रंगनाथ मोरे, विशाल बालाजी मोरे, अजय शिवाजी मोरे, पांडुरंग दगडू मोरे, कमल पांडुरंग मोरे, योगीता जाधव, सुलभा कोळगे, बाबासाहेब कोळगे, नितीन देविदास माळी, सर्व रा. पानवाडी ता. धाराशिव तसेच इतर चार व्यक्तींनी दि. ११ मे रोजी सकाळी घरातून बोलावून फिर्यादी अक्षय दत्तात्रय माने (वय २६ वर्षे,) याांना मारहाण केली. आरोपींनी नारळाच्या झाडाची फांदी का तोडत नाही, या कारणावरून गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, कु-हाड, रॉड, दगडाने मारहाण करुन गंभीर जखमी केले. तसेच फिर्यादीचे आई-वडील हे भांडण सोडवण्यास आले असता त्यांनाही आरोपींनी शिवीगाळ करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

मारहाणीत जखमी झालेल्या अक्षय माने यांच्यावर धाराशिव येथील जिल्हा रूग्णायात उपचार सुरू होते. उपचार दरम्यान पोलीसांना दिलेल्या जबाबावरून दि.१३ मे रोजी ढोकी पोलीस ठाणे येथे कलम १४३, १४७, १४८, १४९, ३२४, ३२३, ५०४, ५०६ भा.दं.वि.सं. अन्वये १३ जणांच्या विरोधात गुन्हा नोंदवला आहे.

## संपादकीय....

# डोळे वटारता वटारता

राजकीयलष्करी पातळीवर आपणास आव्हान देणारा चीन हाच आपला सर्वांत मोठा व्यापारी भागीदार ठरला आहे चीनसंदर्भात आपले परराष्ट्रमंत्री एस जयशंकर कितीही शब्दबंबाळ दावे करोत किंवा आपले पंतप्रधान चीन हा शब्द उच्चारणेही टाळोत; भारतीय बाजारपेठेचे छुपे चीनप्रेम कितीही लपवण्याचा प्रयत्न केला तरी लपणे अशक्य. जागतिक बाजाराची साद्यांत नोंद ठेवणाऱ्या 'ग्लोबल ट्रेड रिसर्च इन्स्टिट्यूट' या संस्थेचा ताजा अहवाल हे दाखवून देतो. त्यावर तातडीने भाष्य आवश्यक ठरते. याचे कारण भारत–चीनसंदर्भात राहिलेले काही मुद्दे लवकरच सोडवले जातील, असे जयशंकर म्हणतात. यातून अर्थातच काही मुद्दे अद्यापही आहेत हे ध्वनित होते. वर, मग 'सुटलेले' मुद्दे कोणते असाही प्रश्न पडतो. असो. खरे तर आपल्या लोकशाहीचे मंदिर वगैरे असलेल्या संसदेत चीनसंदर्भात– 'कसलीही घुसखोरी झालेली नाही, ना कोणी भारतीय हद्दीत आले; ना कोणी येण्याचा प्रयत्न केला' अशा अर्थाची ग्वाही देशवासीयांस सर्वोच्च पातळीवरून दिली गेली आहे. तरीही जयशंकर म्हणतात काही मुद्दे शिल्लक आहेत. पण ते काय आणि कोणते हे विचारणे अडचणीचे. तेव्हा ते न विचारलेले बरे. जनसामान्यांस जे मुद्दे वाटतात ते सत्ताधीशांस वाटतीलच असे नाही. हा दृष्टिकोनाचाही फरक. त्यामुळे त्या चर्चेत जाण्यात काही अर्थ नाही. कारण आपण पाकिस्तानला घर में घुस के मारेंगेचे इशारे देत असताना चीन हा शब्ददेखील आपल्या मुखातून निघत नाही, हे आता सर्वज्ञात आहे. त्यामुळे तो विषय सोडून ज्यावर ठोस काही भाष्य करता येईल अशा विषयाकडे लक्ष वेधणे आवश्यक ठरते. म्हणून हा अहवाल.तो चीन हा पुन्हा एकदा भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार झाल्याचे दाखवून देतो. आतापर्यंत अमेरिका हा आपला सर्वात मोठा व्यापारी भागीदार होता. तथापि या लोकशाहीवादी देशाची साथ भारताने सोडली असून आपल्या बाजारपेठेत अमेरिकेच्या जागी आता चीनची स्थापना झाल्याचे आकडेवारीवरून दिसते. याचा अर्थ भारतीय बाजारपेठेत सद्या:स्थितीत अमेरिकेपेक्षाही अधिक उत्पादने चीन–निर्मित आहेत. यंदाच्या ३१ मार्चला संपलेल्या आर्थिक वर्षात भारत–चीन व्यापाराची उलाढाल ११,८०० कोटी डॉलर्सहून (११८ बिलियन डॉलर्स) अधिक झाली आहे. या एका आर्थिक वर्षात चीनकडून भारतीय बाजारात होणाऱ्या आयातीत ३.२४ टक्क्यांनी वाढ झाली. भारतीय बाजारात आलेल्या चिनी उत्पादनांचे मूल्य १०,१७० कोटी डॉलर एवढे होते. या तुलनेत भारतातून शेजारी चीनच्या बाजारपेठेत शिरकाव करू शकलेल्या उत्पादनांचे मूल्य मात्र जेमतेम १६०० कोटी डॉलर्स (१६.६७ बिलियन डॉलर्स) इतकेच वाढले. याचा अर्थ सरळ आहे. भारतीय बाजारात चीनमधून येणाऱ्या उत्पादनांच्या तुलनेत त्या देशाच्या बाजारपेठेत जाणाऱ्या भारतीय उत्पादनांचे मूल्य अगदीच नगण्य आहे. यातही (म्हटले तर) लाजिरवाणे सत्य असे की २०१९ ते २०२४ या चार वर्षांच्या कालखंडात भारतातून चीनकडे होणाऱ्या निर्यातीत प्रत्यक्षात घटच झाली आणि त्याच वेळी चीनमधून भारतीय बाजारपेठेत येणारी उत्पादने मात्र वाढली. आपली निर्यातीतील घट ०.६ टक्के इतकी होती तर चीनमधून होणाऱ्या आयातीतील वाढ मात्र होती थेट ४४.७ टक्के इतकी. हे सत्य लाजिरवाणे ठरते याचे कारण याच काळात लडाखमधील गलवान खोरे परिसरात भारत–चीनमधील चकमकींत अनेक भारतीय जवानांचे बळी गेले. त्याआधी चीनमधून भारतात होणाऱ्या निर्यातीचे मूल्य होते ७०३२ कोटी डॉलर्स इतके. ते वाढत वाढत जाऊन १०,१७० कोटी डॉलर्सवर गेले. म्हणजे एका बाजूला चीनबरोबरच्या संघर्षात भारतीय सैनिकांवर निष्कारण रक्त सांडण्याची वेळ येत असताना भारतीय बाजार मात्र चीनमधून येणाऱ्या अनेकानेक उत्पादनांनी ओसंडून वाहू लागला होता. भारतीय हद्दीतील गलवान खोऱ्यात चिनी सैनिकांनी घुसखोरी करून भारतीय जवानांचा हकनाक बळी घेतला. त्यानंतर हे चिनी सैनिक संपूर्णपणे माघारी गेले किंवा काय याबाबत मतभेद आहेत. परराष्ट्रमंत्री जयशंकर भारत–चीन संबंधांबाबत 'राहिलेले मुद्दे' सोडवले जातील अशी आशा व्यक्त करतात ती याचबाबत. वास्तविक या संघर्षानंतर अनेकांनी नेहमीप्रमाणे चिनी उत्पादनांवर भारतीयांनी कसा बहिष्कार घालायला हवा वगैरे शहाणपणा सांगण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार अनेकांनी मग दिवाळीत वा अन्य सणासुदीस वापरले जाणारे चिनी बनावटीचे लुकलुकते विजेचे दिवे आदी खरेदीवर बहिष्काराचा निर्धार केला. तथापि असे करणे हे बादलीभर पाणी उपसल्याने समुद्र आटला असे म्हणण्यासारखे होते. ताजी आकडेवारी हे कटू सत्य अधोरेखित करते.

घाऊक औषधे, औद्योगिक रसायने, संगणक, दूरसंचार उपकरणे इतकेच काय सौर ऊर्जा सामग्री आणि विजेऱ्या इत्यादी उत्पादनांवर चीनची जवळपास मक्तेदारी आहे आणि आपणास तूर्त तरी ही चिनी उत्पादने खरेदी करत राहण्यावाचून पर्याय नाही. चीनकडून जे काही आपण खरेदी करतो त्यातील बराच भाग फक्त स्मार्ट फोन्स वा त्यासाठी आवश्यक घटकांचा आहे. ही रक्कम साडेचारशे कोटी डॉलर्सच्या आसपास आहे. लॅपटॉप, संगणक यांबाबतचे वास्तवही असेच. अलीकडे सौर ऊर्जा अणि विजेवर चालणाऱ्या चारचाकी मोटारींचे बरेच कौतुक केले जाते. आपल्याकडे तर आता पुढील युग यांचेच असाच अजागळ समज अनेकांचा दिसतो. यातही चीनची मक्तेदारी आहे आणि सौर ऊर्जा निर्मितीसाठीच्या पट्ट्या आणि विजेऱ्यांसाठी लागणारे लिथियम हे मूलद्रव्य आपणास चीनकडून खरेदी करावे लागते. चीनकडून या काळात आपण घेतलेल्या बॅटऱ्यांचेच मूल्य २२० कोटी डॉलर्सपेक्षाही अधिक आहे. हे ठीक. पण त्याच वेळी भारतातून चीनच्या बाजारात जाणाऱ्या वस्तूंत वाढ झाली असती तर ते एक वेळ समजून घेता आले असते. मात्र आपली निर्यात होती तेथेच स्तब्ध आणि त्याच वेळी चीनमधून होणाऱ्या आयातीत मात्र वाढ अशी ही आपली वेदना आहे.यावर केंद्र सरकारने 'उत्पादन–आधारित–उत्तेजन' (प्रॉडक्ट लिंक्ड इन्सेंटिव्ह–पीएलआय) ही योजना आणली खरी. पण त्याचे फलित दिसू लागले असे अद्याप म्हणता येत नाही.

# लोकसभा निवडणूकीत मतदारांनी घडविलेले राजकीय परिवर्तन?.

भारतात जो सत्तर वर्षात विकास झाला नाही.तो २०१४ नंतर झाले.त्याच बरोबर समाजात वैचारिक परिवर्तन तर एवढे झाले की भारतीय जनतेची उघड्या डोळ्यांनी पाहण्याची आणि कांनाने ऐकण्याची सवय तर पूर्णपणे बदलून गेली.आर एस एस प्रणित सर्व संस्था,संघटना,पक्ष प्रिंट मीडिया चॅनल मीडिया शंभर टक्के छातीठोकपणे सांगत आहेत.भारत बदल रहा है.यातील ठळक बदल कसे घडविले गेले.लोकसभा निवडणूकीत मतदारांनी घडविलेले राजकीय परिवर्तन?.त्यामुळेच भारताचा विकास आणि राजकीय परिवर्तन कसे झाले?. यावर नजर टाकु.

भारतीय न्यायव्यवस्था ही जगात आदर्श मानली जात होती. कारण ती निर्भीड निःपक्षपाती निधर्मी होती.भारतीय संविधाना नुसार न्यायालयात न्याय देण्यासाठी सांगितल्या जात होते की शंभर अपराधी सुटले तरी चालतील पण एकाही निरपराध नागरिकांचा बळी जाता कामे नये. म्हणूनच न्यायालय यंत्रणा पोलीस प्रशासकीय यंत्रणेद्वारे विविध मार्गाने तपासणी करून आरोपीवर आरोपपत्र म्हणजे एफ.आय.आर दाखल करून घेत असते.त्यात पंचनामा,साक्षीदार यांच्या जबाण्या लिहून घेतल्या जातात.त्यावर लिहून घेणारा अधिकारी.लिहून देणारा व्यक्ती आणि साक्षीदार यांच्या साह्य घेतल्या जातात.त्यामुळेच न्यायालयात शंभर टक्के सत्य समोर येते व न्याय मिळत असतो.यांची सर्व भारतीयांना खात्री होती.कारण प्रशासकीय यंत्रणा निर्भीड निःपक्षपाती निधर्मी होती.सत्तर वर्षाची महान परंपरा २०१९ नंतर मोडीत निघाली असे कोण म्हणतात?.तर सुप्रिम कोर्टाचे मुख्य न्यायाधीश.त्यांच्या आदेशाची कोणतीही अंमलबजावणी होत नाही. तेव्हा त्यांना जाहीर पत्रकार परिषद घेऊन भारतीय जनतेला भारतीय न्यायव्यवस्था वाचवण्यासाठी आवाहन करावे लागते. मग सांगा देशाचा विकास झाला काय?. किंवा राजकीय परिवर्तन म्हणावे लागेल काय?.लोकसभा निवडणूकीत मतदारांनी घडविलेले राजकीय परिवर्तन.होते की ई व्ही एम मशीनमुळे घडविलेले राजकीय परिवर्तन होते. याचा विचार मतदारांनी गांभीर्याने करण्याची वेळ लोकसभा निवडणुक २०२४ च्या अंतिम टप्प्यात आली आहे.

भारतीय संविधानाने न्यायालयाने सर्वांना समान न्याय आणि समान अधिकार दिले आहेत.इथे पंडित जवाहरलाल नेहरु प्रधानमंत्री असताना व मोहनचंद करमचंद गांधी यांना महात्मा म्हटल्यावर ही सनदशीर मार्गाने अटक करून कोर्टात हजर करण्यात आले होते. रीतसर न्यायालयाने कामकाज करून दंड व शिक्षा दिली होती.मोदीनी दहा वर्षे सत्ता भोगल्या नंतर भारतीय संविधानाच्या सर्व चौकटी मोडून मनुस्मृतीची अंमलबजावणी सुरू केली आहे. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश व जेष्ठविधी तज्ञांनी जनतेला भारतीय न्यायव्यवस्था वाचविण्याचे आवाहन केले होते.दिल्लीच्या सीमेवर पंजाब हरियाणा राज्याचा शेतकरी ठामपणे ठाणं मारून बसला होता, देशभरातील शेतकरी त्यांना पाठिंबा देण्यासाठी तिथे येत होता.केंद्र सरकार म्हणण्यापेक्षा मोदी अतिशय अहंकाराने त्या शेतकरी आंदोलनाकडे दुर्लक्ष करीत होता, न्याय व्यवस्था निद्रा अवस्थेत होती.ती तिचे कर्तव्य पूर्णपणे विसरली होती.हे आजचा शेतकरी हिंदू मतदार म्हणून विसरला असेल काय ?.

पोलीस अधिकारी नेहमीच कोणत्यानां कोणत्या दबावाखाली काम करीत असतात. खोट्या चकमकीत खरे निरपराध बळी जात असतात.खोटे पंचनामे,साक्षीदार अनेक केस मध्ये उभे करून केस कोर्टात टिकणार नाही याची खबरदारी स्वता पोलीस घेत असतात.त्यांचा योग्य मोबदला मिळाला तर अन्याय अत्याचार करणारे साक्षीदार व पुराव्या अभावी निर्दोष सुटतात. तेच पुढे भाई,दादा,काका,साहेब म्हणून स्थानिक पातळीवर राजकिय मान्यताप्राप्त नेते बनतात.तालुका पंचायत समिती,जिल्हा परिषद नंतर आमदार खासदार अशी त्यांची प्रगती होत जाते.

ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी यांना प्रथम सवलत दिली तेच अधिकारी यांच्यापुढे नतमस्तक होतात. शहनशहा अमित शहा यांच्या जीवनावर सिनेमा बनविला तर त्यांची पटकथा हीच राहील.

पोलिस प्रशासकीय यंत्रणा निर्भीड निःपक्षपाती निधर्मी कर्तव्यदक्ष असली तर अशी परिस्थिती निर्माण होत नाही. पण अशी कीड लागलेली यंत्रणा असु शकते यांची जाणीव ठेऊनच त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी उच्चशिक्षित प्रशिक्षित पोलिस प्रशासकीय आय पी एस अधिकारी सी आय डी आणि सी बी आय ही स्वायत्त असलेली यंत्रणा असते.ती देशहितासाठी कोणाच्याही मुसक्या बांधू शकते.सत्तर वर्षात या सी आय डी आणि सी बी आय चा भारतातील सर्व क्षेत्रातील मान्यवरांना विशेष राजकीय नेत्यांना धाक होता.तो २०१९ नंतर कसा संपवला यांची जागरूक नागरिकांना माहिती असेलच.सीबीआय चिपला रात्री दोन वाजता काढल्या जाते ही सत्तर वर्षातील पहिली घटना असेल काय?.कारण मी तसे कधी भारतात घडल्याचे वाचले नाही. ते माझे अज्ञान असु शकते. तरी सीबीआय चे अनेक उच्चपदस्थ अधिकारी सीबीआय वाचवण्यासाठी राष्ट्रपतीसह राजकीय नेत्यांना नागरिकांना आवाहन करतात.म्हणजेच देशाहितासाठी किती गंभीर घटना होती. आज आपण मतदार म्हणून ते विसरलो की काय?.मग विकास कोणाचा झाला व राजकीय परिवर्तन कुठे घडले?. लोकसभा निवडणूकीत मतदारांनी घडविलेले राजकीय परिवर्तन होते काय?.

जगात प्रत्येक देशात त्यांच्या चलनाला खूप महत्व असते. त्यावर त्यादेशाचे अंतरराष्ट्रीय पातळीवर बाजारपेठ,शेयर मार्केट,गुंतवणूक आणि उधोगधंदात महत्व प्राप्त होते. यावर सरकारचे नाही तर रिजर्व बँकेच्या गव्हर्नरचे पूर्णपणे नियंत्रण असते.त्यांच्या देखरेखीखाली देशातील सर्व प्रकारच्या बँका आर्थिक व्यवहार करतात. म्हणूनच कोणताही देश चलन बदली करतांना हजारदा विचार करतो.सत्तर वर्षात कोणत्याही सरकारने रिजर्व बँक गव्हर्नर वर नियंत्रण ठेवण्याची हिंमत केली नाही.पण मोदी सरकारने भ्रष्टाचार,अतिरेकी कारवाया,काळा पैसा,अनेक संकटांना कायम स्वरूपी मिटविण्यासाठी नोटबंदी केली होती. बँक कर्मचारी अधिकारी यांनीच नोटा बदली करण्याचा मोठा धंदा केल्याचे बोलले जात होते. यात रामदेवबाबा सारखा लक्षवेधी योगी राजकारणी,लफडेबाज बाबा होता. तो म्हणतो बहुसंख्येने बँकवाले बेईमान झाले त्यांनी पाच हजार नव्हे तर पाच लाख कोटी रुपयांचा घोटाळा केला होता.म्हणजे नोटबंदी हा देशातील सर्वात मोठा आर्थिक घोटाळा होता. त्या घोटाळ्यात कोणाचा विकास झाला आणि कोणाच्या आर्थिक परिस्थितीत परिवर्तन झाले.यांची सनदशीर मार्गाने चौकशी करण्यात आली पाहिजे. या सर्व अंधाधुंदी कारभाराला वैतागून रिजर्व बँक गव्हर्नर रघुरामन यांनी राजीनामा दिला होता.खरे खोटे प्रिंट चॅनल मीडिया सांगणार लिहणार नाही.

रिजर्व बँक गव्हर्नर यांना मोदीने चपराशी बनवुन टाकले होते.ते सहन झाले नाही म्हणून कोणत्याही कर्तव्यदक्ष अधिकारी देशहितासाठी संघर्ष करून बाहेर पडतो. त्यांच्या जागी उर्जित पटेल गव्हर्नर आणला तो कोणत्या विश्व विद्यापीठाचा अर्थतज्ञ होता माहीत नाही. त्याला ही मजबूर होऊन सोडून जावे लागले. नोटबंदीमुळे कोणाचा विकास झाला व कोणाचे परिवर्तन झाले.हा आत्मचिंतनाचा विषय आहे. सत्तर वर्षात जे झाले नाही ते दहा वर्षात झाले. विकास कोणाचा झाला?. व परिवर्तन कुठे घडले?. भारताचा विकास कुठे कसा झाला.आणि राजकीय परिवर्तन कोणाचे कसे झाले?. हे तपासण्यासाठीच दरपाच वर्षाने प्रत्येक लोकशाही मानणाऱ्या देशात सार्वजनिक निवडणूका होतात.

लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा निर्भीड निःपक्षपाती निधर्मी पणे जनतेला मतदान करून लोकप्रतिनिधी निवडण्याची संधी उपलब्ध करून देतात.ही निवडणूक प्रकिर्या निधर्मी निर्भीड व निःपक्षपाती असण्यासाठी निवडणूक आयोग ही स्वतंत्र यंत्रणा असते. ईव्हीएम मशीन आल्यापासून ती पक्षपाती,धर्मांध,स्वार्थी झाली आहे.ती सतत अफरातफर करून भ्रष्टाचाराच्या वाम मार्गाने वाटचाल करतांना दिसत आहे. त्यामुळेच निवडणूक आयोग मोदींचा घरगडी झाल्या सारखा वागतांना दिसत होता. अशा वेळी भूतपूर्व निवडणूक आयोग प्रमुख टी एन शेषन यांची आठवण आल्या शिवाय राहत नाही.तो निःपक्षपाती निर्भीड कर्तव्यदक्षपणा आजच्या कोणत्याही अधिकाऱ्यात दिसत नाही.२०२४ च्या लोकसभा निवडणूका पण त्यात विश्वास पात्रता फार कमी असेल. निवडणूकीतील मुख्य मुद्दा विकास कोणाचा झाला व परिवर्तन कुठे घडले?. हा मुख्य मुद्दा मागे पडला असेल.जात,धर्म राम मंदिर यालाच जास्त महत्व दिले जात आहे.

ेकशाहीचा चौथा खांब म्हणजे पत्रकारिता,प्रिंट,चॅनल मीडिया हा सध्या रुग्णशय्यावर पडलेला आहे.पत्रकारांचे काम असते जसे दिसते तसेच लिहणे वृत्तपत्राचे काम असते जसे लिहून दिले तसेच छपाई करून प्रसिध्द करणे.जे सत्य आहे त्यांची सत्य माहिती जनतेला वाचकांना देणे. हे सध्या पूर्णपणे थांबले आहे. प्रिंट,चॅनल मीडिया मोदी सरकारचे पाळीव प्राण्यांची भूमिका पार पाडत आहे.सरकारला व प्रशासकीय अधिकाऱ्यांना प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारांना बाहेर हाकलून देण्यात आले आहे. ते घरात बसून आहेत. प्रिंट,चॅनल मीडिया जनतेला जी माहिती हवी आहे ती देत नाही तर सरकार ला जी हवी तीच माहिती देते. म्हणजेच सरकारने म्हटले हा विकास आणि हे परिवर्तन झाले, तर जनतेने चुपचाप मान्य करावे.त्यांनी उलट प्रश्न करू नये. जर त्याने उलट प्रश्न केला तर तो देशद्रोहीच्या व्याख्येत बसला म्हणून समजा. त्यांनी जेल मध्ये जाण्याची तयारी करावी किंवा घरात गप्प बसावे.त्याने देशात अंधा कानून आहे असे म्हणू नये तर नमो नमो आहे असे म्हणावे.म्हणजेच देशाहितासाठी हया गंभीर घटना आहेत.मग विकास कोणाचा झाला व परिवर्तन कुठे घडले?. २०१४ ते २०२० पर्यतचा एकूण सामाजिक,धार्मिक,शैक्षणिक आर्थिक आणि राजकीय विकास आणि परिवर्तन झाला. हे उध्वस्त कामगार,कर्मचारी,अधिकारी आणि शेतकरी,शेतमजूरांनी मतदार म्हणून विचार करणे आवश्यक आहे.भारताचा विकास आणि राजकीय परिवर्तन कसे झाले?.



कुठे झाले हे कृपया विचारू नका. त्यासाठी गांभीर्याने आत्मचिंतन व परीक्षण करा त्यासाठी मतदान करा कारण लोकसभा निवडणूकीत मतदारांनी घडविलेले राजकीय परिवर्तन हवे आहे. म्हणूनच एवढेच म्हणावे लागते.मतदान करा. आपला एक दिवसाचा अधिकार गाजवा नंतर पाच वर्ष तुम्हाला कोणी हात जोडणार नाही. किंमत ही देणार नाही.

***********

**सागर रामभाऊ तायडे,**
**९९२०४०३८५९,**
**भांडुप मुंबई.**

# समतेची वाणी वामनदादाची गाणी

वामनदादा हे फक्त नाव नाही तर प्रबोधनाची मशाल आहे, विचाराचे वादळ आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ, विचार व कार्य गावखेड्यातील घराघरात पोहचवण्याचे काम वामनदादा कर्डक यांनी केले. वामनदादा कर्डक यांच्या प्रत्येक रचनेमधुन, प्रत्येक विचारामधुन तथागत गौतम बुद्ध व बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित समता दिसुन येते. आंबेडकरवादी चळवळ घराघरात पोहचवून चळवळीला इमानदार कार्यकर्ते वामनदादा यांनी तयार केले. वामनदादाची लेखणी समतेसाठी व भिम विचारासाठी येथे सतत झिजत होती. समता कुठे आहे याबद्दल वामनदादा लिहतात..

इथे नाही जातीयवाद ना पोकळ वर्णभेद
सर्वावरती करतो प्रिती माझा गौतम बुद्ध
दार खुले हे सर्वांना, शूद्रांना चांडाळांना
साळी, माही, ब्राह्मण कोळी। विलीन व्हारे त्रिसरणी
कुणीही यावे शुद्ध बनावे बुद्धाच्या चरणी

बुद्ध हा समस्त जगाचा समतावादी आहे म्हणून बुद्धांसमोर कोणताही भेद नाही. मानव म्हणून समतावादी जगायचे असेल तर बुध्दाचे विचारच आपणास एकत्र आणु शकतात म्हणून सर्वांनी बुद्धाजवळ यायला पाहिजे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य गाण्याच्या माध्यमातून लोकांच्या मनावर बिंबवण्याचे काम वामनदादा कर्डक यांनी केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित समता, बंधुता, एकी, सामाजिक न्याय वामनदादा कर्डक यांच्या साहीत्यात दिसून येते. वामनदादा यांचे साहित्य काव्य वाचताना आजही समाजाचे दृश्य डोळ्यासमोर उभे राहते. सर्वांनी एकतेने राहण्यासाठी दादा लिहतात...

सांगू किती मी दादा
एकतेने येथे नांदा
यारे सारे भाऊ भाऊ
एकतेने प्रेमभावे येथे राहु
तुटले दुवे हे सांधा
एकतेने येथे नांदा


आजही आपण बघितले तर आपण जयभीम जोरजोरात बोलतो परंतु बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संदेशाचे पालन करत नाही. सामाजिक आणि राजकीय पातळीवर एवढी बेकी आहे की एक व्हायला तयार नाहीत. उठसुठ कोणी उठतो आणि स्वतः चे दुकान थाटतो. परंतु अगोदरच असलेल्या बेकीचे एकीकरण करण्यासाठी कोणी च समोर येत नाही कींवा एकीकरणासाठी कोणी थोडे नमते घेऊन एकमेकांच्या हातात हात द्यायला तयार नाहीत. बेकी करून राहणारे लोकांमध्ये एक गोष्ट सारखी आहे ती म्हणजे डॉ बाबासाहेब यांचे नाव व दुसऱ्यांना सांगण्यासाठी विचार. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार स्वतः जगणारे लोक अपवादात्मक आहेत म्हणून दादा लिहतात...

भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते
तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते
वाणीत भीम आहे करणीत भीम असता
वर्तन तुझ्या पिलांचे सारेच चोख असते

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊ त्यांच्या नावाचे व विचाराचे भांडवल बनवून प्रत्येक जन स्वतः ची झोळी लाचार होऊन भरत आहेत. परंतु वामनदादा यांच्या मते पाच लोक एकत्रितपणे जरी बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे असते तर आज आंबेडकरवादी चळवळ, लोकांचे स्थान, लोकांना सन्मान हा वेगळ्याच प्रकारचा असून विचाराचे लोक असतेच तर देशात वजन असते. परंतु फक्त वाणीतच भीमाला बंदिस्त करून कर्णीत भिम नसल्याने समाजाचे अतोनात नुकसान झाले आहे. असे वामनदादा ही सांगतात तरीही लोकांना विचाराचे व चळवळीचे गांभीर्य राहीले नाही. जो तो स्वतः ची दुकानदारी चालवण्यासाठी बेकी करून स्वतः संघटना काढतो व गावातही कोणी ओळखत नसलेला स्वतः लाच राष्ट्रीय नेता म्हणून घोषित करतो. म्हणून वामनदादा लिहतात.......

संघटना हजार झाल्या, नेते हजार झाले
कोणा म्हणावे आपुले चेहरे, हजार झाले
तु पाहीलेली स्वप्ने पुर्ण झालीत कारे?
भिमा तुझ्या मताची लोक मेलीत कारे?

दुकानदारी करून, स्वतः ला नेते समजणाऱ्या लोकांना वामनदादा बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे समजतच नाहीत. कारण स्वतः ची दुकानदारी चालावी म्हणून संघटना काढून अध्यक्ष होणारे लोक चळवळीची वाट लावतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकांमध्ये जो स्वाभिमान, सन्मान दिला होता तो स्वाभीमान, तो कणखर पणा आज लोकांमध्ये दिसत नाही कारण आज लोक स्वतः ची झोळी भरण्यासाठी कोणाचीही लाचारी स्विकारून चाटूगीरी करायला तयार होतात. म्हणून वामनदादा लिहतात.....



मला चिड येत नाही हाच माझा गुन्हा
दोष देऊ कुणा, सांगा दोष देऊ कुणा
आहे तेच माझे गाव आणि तेच गावकर
माझा भिम असताना कापायचे थरथर
गेला गेला भिमराणा, आला नेभळटपणा

भिम गेल्या पाठी भिमाने निर्माण केलेला दरारा, त्यांनी दिलेला स्वाभिमान येथून निघून गेला कारण लोकांनी इमान विकायला सुरुवात केली. प्रस्थापितांची गुलामी आणि लाचारी करून स्वतः चा सन्मान गमवणाऱ्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळेच सामाजिक पतन होताना दिसत आहे. सामाजिक पतन होत असताना स्वार्थ व संधी साधु लोकांमुळे समाजाचे विभाजन होऊन तुकडे तुकडे झाले. चळवळ व सामाजिक आंदोलनाडे फारसे कोणाचे लक्ष नाही. म्हणून वामनदादा लिहतात..

म्हणवीती भीमाचे चेले जरी हे मेले
यांनीच भीमाचे तुकडे तुकडे केले
बांधला भीमाने संघटनेचा किल्ला
हे तिथेच करती रणगाड्यांनी हल्ला
कोसळला किल्ला आता कुणी हे बोले
म्हणवीती भीमाचे चेले तरी हे मेले

बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने अनेक संघटना पक्ष तयार करून तुकडे तुकडे करून ठेवले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा संदेशच विसरून गेले. डॉ बाबासाहेब आंबेडकर गेल्यापाठी आपल्याला काहीच करायचे नव्हते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी करून ठेवलेले फक्त जतन करायचे होते पण धुर्त लोकांनी तेही केले नाही. शिक्षणासाठी पिपल्स एज्युकेशन सोसायटी, धम्माच्या प्रसार प्रसारासाठी भारतीय बौद्ध महासभा, संरक्षणासाठी समता सैनिक दल, राजकारणासाठी रिपब्लिकन पक्ष अस सर्व काही बाबासाहेब आंबेडकर यांनी करून ठेवले असताना त्यांचे व्यवस्थित संगोपन ही झाले असते तर आज वेगळाच रुबाब असता परंतू याचेही तुकडे तुकडे करून बाबासाहेब आंबेडकर यांची वाटणी करून घेतली. ज्यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर चालुन राष्ट्रहीत जोपासायला पाहिजे होते तेच लोक लाचार झाल्याने सत्ता हाती असलेल्या लोकांनी देश विकुन टाकला. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येकाला देशाचा मालक बनवला परंतु वास्तवात देशाची बरिच मोठी संपती उद्योगपती च्या घशात घातली. जनतेच्या रक्ताचे पाणी करून हा देश चालतो आणि याच लोकांना कष्टकरी लोकांना उपाशी रहावे लागते हि मोठी शोकांतिका आहे. म्हणून दादा लिहतात...

टाटा बिर्ला तरतील
बाकी सारेच उपाशी मरतील
सारे परदेशी येतील
ताबा धंद्याचा घेतील
तेच तिजोरी भरतील
बाकीचे सारे उपाशी मरतील

वरिल रचनेवरून वामनदादा यांचा दुरदृष्टीकोन दिसुन येतो. आज उद्योग धंदे व पैसा विशिष्ट लोकांच्या हाती गेला, सेझ च्या नावाखाली विदेशी कंपन्या देशात येत आहे. जनतेची निव्वळ लुट सुरू आहे. या यातून आर्थिक विषमता देशात परिपक्व केली जात आहे. धार्मिक द्वेष करून राजकीय झोळी भरण्यासाठी स्पर्धा लागलेली आहे. हिंदु मुसलमान वाद पेटवून माणसामध्ये वैर निर्माण करण्याचे काम आज राजकीय नेते महापुरुषांचे नाव घेऊन करत आहेत. म्हणून वामनदादा अशा लोकांना धडा शिकवण्यासाठी लिहतात...

शिवरायांच्या छायेखाली कधीच नव्हती वाण..!
आनंदाने नांदत होते हिँदू मुसलमान ..!!
काळ्यारात्री तळपत होतं जिच्या रूपाचं उन,
अशी देखणी होती एका मुस्लीमाची सून,
त्या तरूणीला आई म्हणाला राजा तो शीलवान,
आनंदाने नांदत होते हिँदु मुसलमान....!!

छत्रपती शिवाजी महाराज राजे होते. त्यांच्या वर कोणतेही बंधने नव्हते तरीही त्यांनी नैतिक संस्कार जपले. हिंदु मुसलमान वाद कधीच झाले नाही. एवढेच नाही तर राजेशाही असुनही त्यांनी महिलांना संरक्षण देण्याचे व सन्मान देण्याचे काम केले. आजची परिस्थिती बघितली तर सत्तेत असलेल्या आमदार खासदारांवर बलात्कार सारखे गंभीर गुन्हे दाखल असताना त्यांना सरकार कडून च पाठीशी घातले जाते एवढे नैतिक पतन आज आपल्याला झालेले दिसते. आणि हे सर्व फक्त जाती धर्माच्या नावावर केलेल्या निच राजकारणामुळे घडत आहे. जातीधर्माच्या नावाखाली बलात्काराच्या गंभीर गुन्हेगार गाराला सुद्धा येथे आश्रय देऊन निर्दोष ठरवले जाते. म्हणून जात पात मोडून फक्त माणसाला किंमत असायला पाहिजे म्हणून वामनदादा लिहतात....

धर्म इथे आहे तर जातपात आहे
जातपात आहे तर घातपात आहे
अशा घातपाताला नको आज थारा
जळु द्या हा धर्म येथेच साराच सारा

धर्मापेक्षा माणसाचे कर्म महत्त्वाचे आहेत आणि धर्माच्या नावावर जर घातपात होत असेल तर असा धर्म जाळणे गरजेचे आहे असे दादा म्हणतात. वामनदादा यांच्या प्रत्येक शब्दांत सत्य, समता व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव होतो. आंबेडकरवादी चळवळीतील एक सर्वात मोठे नाव लोकशाहीर वामनदादा कर्डक हे होय. अशा थोर व सच्चा अनुयायी यांचा आज स्मृतीदिन.. दादांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन...

*******

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# शेवग्याच्या शेंगा व भाजीमध्ये दडलेले फायदे वाचा, एका दिवसात किती व कसा खावा शेवगा? तज्ज्ञांनी सांगितलं कॅलरीजचं सूत्र



काही,महिन्यांपूर्वी स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदींपासून ते अनेक तज्ज्ञ डॉक्टरांनी सुद्धा मोरिंगा म्हणजेच शेवग्याचा पाला व शेंगा या आरोग्यदायी आहेत असे सांगितले होते. तेव्हापासूनच या पारंपरिक भाजीला बरेच महत्त्व प्राप्त झाले आहे. तुम्हाला माहीत आहे का? शेवग्यामध्ये सुमारे ६.७ ग्रॅम प्रोटीन असते जे स्नायूंच्या आरोग्यासाठी सर्वोत्तम मानले जाते, इतकंच नाही तर शेवग्याच्या पाल्यामध्ये संत्र्यापेक्षा सातपट जास्त व्हिटॅमिन सी, पालकापेक्षा तिप्पट लोह आहे आणि दुधापेक्षा चारपट जास्त कॅल्शियम असते. उन्हाळ्यात तर शरीराचा नैसर्गिक कूलर म्हणून शेवग्याचा पाला किंवा शेंगा काम करू शकतात. आज आपण या शेवग्याच्या भाजीच्या सेवनाचे फायदे तसेच तुमच्या आहारात त्याचा समावेश कसा करता येईल याविषयी जाणून घेणार आहोत.

इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटल्स, नवी दिल्ली येथील पोषणतज्ज्ञ कनिका नारंग यांनी इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या माहितीनुसार, शेवग्याच्या पानांमध्ये व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, कॅल्शियम, पोटॅशियम आणि लोह यासारख्या आवश्यक पोषक तत्वांचा साठा असतो. ही पोषक तत्त्वे दृष्टी, रोगप्रतिकारक शक्ती, हाडांची ताकद आणि रक्तातील ऑक्सिजनची पातळी वाढवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. शेवगा हा १८ प्रकारच्या अमीनो ऍसिडने समृद्ध असतो.

शेवग्याच्या पानांचे व शेंगांचे फायदे १) शेवग्यामध्ये क्वेर्सेटिन, क्लोरोजेनिक ऍसिड आणि बीटा-कॅरोटीन यांसारख्या अँटीऑक्सिडंट्स असतात. हे ऑक्सिडेटिव्ह तणावाचा सामना करण्यास मदत करतात, जळजळ कमी करतात आणि पेशींचे नुकसान होण्यापासून संरक्षण करतात, त्यामुळे हृदयविकाराचा झटका, कोलेस्टेरॉल आणि रक्तदाब यांसारख्या आजारांचा धोका कमी होतो.

२) शेवग्यामधील व्हिटॅमिन सी रोगप्रतिकारक शक्ती वाढवते, शरीराला संक्रमण आणि आजारांशी लढण्यास मदत करते, जे विशेषतः उन्हाळ्यात फायदेशीर ठरते

३) शेवग्यामध्ये कमी-कॅलरी असल्याने पोषण पुरवून वारंवार लागणारी भूक कमी करण्यास याची मदत होते. शिवाय यातील फायबर पचनास विलंब करण्यासाठी उपयुक्त ठरते.

४) शेवग्याच्या पानातील आयसोथिओसायनेट्स नावाचे नैसर्गिक अँटिऑक्सिडंट रक्तातील साखरेची पातळी स्थिर करतात. ऑक्सिडेटिव्ह नुकसानापासून संरक्षण करणाऱ्या पॉलिफेनॉलमुळे यकृताच्या पेशींच्या दुरुस्तीला ही भाजी गती देते व यकृतातील प्रथिनांची पातळी देखील वाढते.

शेवग्याचे सेवन करताना काय लक्षात ठेवावे?

दिवसातून दोनदा तुमच्या आहारात शेवग्याचा समावेश करता येईल. प्रत्येक वेळी एक चमचा शेवग्याची पावडर किंवा एक मूठभर शेवग्याची पाने खाणे पुरेसे ठरते. या प्रमाणाच्या प्रत्येक सर्व्हिंगमध्ये साधारण ३५ कॅलरीज असतात त्यानुसार आपण आपल्या आहारातील अन्य घटकांची निवड करू शकता. शेवग्याची पाने ही सर्वसाधारणपणे सेवनासाठी सुरक्षित असली तरी, गर्भवती किंवा स्तनपान देणाऱ्या महिलांनी त्यांचा आहारात समावेश करण्यापूर्वी त्यांच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

आपल्या आहारात शेवग्याची पाने कशी जोडावी? स्मूदीज: केळी, बेरी आणि आंबा यांसारख्या फळांसह ताजी किंवा पावडर केलेली शेवग्याची पाने मिसळून पेय बनवू शकता.

पेस्टो: पास्ता सॉस, किंवा चटणीमध्ये शेवग्याची पाने वापरता येऊ शकतात.

चहा: हर्बल चहा बनवण्यासाठी गरम पाण्यात शेवग्याची पाने भिजवा. अतिरिक्त चव आणि फायद्यांसाठी मध आणि लिंबू घाला.

सॅलेड: नेहमीच्या काकडी, टोमॅटोच्या सॅलेडमध्ये आपण शेवग्याची पाने घालू शकता. कोशिंबिरीत सुद्धा आपण कोथिंबीरसह बारीक चिरून शेवग्याची पाने घालू शकता.

# 'या' ५ गोष्टी केल्यास स्तनाच्या कर्करोगाचा धोका होऊ शकतो कमी



स्तनाचा कर्करोग हा महिलांमध्ये जास्त प्रमाणात आढळणारा कर्करोगांपैकी एक आहे. अभ्यासनुसार दरवर्षी जगभरात लाखो नवीन प्रकरणांचे निदान केले जाते. पोषक पदार्थांचा अभाव, अनुवांशिक घटक, वय, लठ्ठपणा आणि जीवनशैली या सर्व घटकांमुळे स्तनाचा कर्करोग होऊ शकतो. स्तनाच्या कर्करोगाचा धोका कमी करण्यासाठी तुम्ही पुढील गोष्टी करू शकता.

वजन नियंत्रणात ठेवणे स्तनाच्या कर्करोगाचा धोका कमी करण्यासाठी वजन नियंत्रणात ठेवणे गरजेचे आहे. जास्त वजन, विशेषत: रजोनिवृत्तीनंतर, स्तनाच्या कर्करोगाचा धोका वाढतो. नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटच्या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार , लठ्ठपणामुळे पोस्टमेनोपॉझल महिलांना निरोगी महिलांपेक्षा स्तनाचा कर्करोग होण्याचा धोका ३०-६०% जास्त असतो.

नियमित व्यायाम करा अभ्यासानुसार असे दिसून आले की नियमितपणे व्यायम केल्यास स्तनाच्या कर्करोगाचा धोका कमी होतो. ब्रिटीश जर्नल ऑफ कॅन्सरमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात असे दिसून आले आहे की ज्या महिला शारीरिकरित्या सक्रिय होत्या त्यांना स्तनाच्या कर्करोगाचा धोका २०% कमी असतो. तसेच निरोगीआरोग्यासाठी योगा करणे चांगला असतो.

नियमितपणे तपासणी करावी मेमोग्राम, क्लिनिकल स्तन तपासणी आणि स्व-तपासणी यासह नियमित तपासणी करावी. अमेरिकन कॅन्सर सोसायटीच्या मते, नियमित मेमोग्राम स्तनाचा कर्करोग सर्वात उपचार करण्यायोग्य असताना सुरुवातीच्या टप्प्यात शोधण्यात मदत करू शकतात. त्यामुळे वेळेवर तरासणी करावी. आरशासमोर उभे राहून दोन्ही स्तनांची तपासणी करून महिला स्तनाच्या कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे ओळखू शकतात.

स्तनपान असे दिसून आले आहे की स्तनपानामुळे स्तनाच्या कर्करोगाचा धोका कमी होतो. नाल्स ऑफ ऑन्कोलॉजीमध्ये प्रकाशित मेटा-विश्लेषणात असे आढळून आले की १२ महिन्यांपेक्षा जास्त काळ स्तनपान केल्याने स्तनाचा कर्करोग होण्याचा धोका कधीही स्तनपान न करणाऱ्या महिलांच्या तुलनेत २६% कमी झाला. सकस आणि पौष्टिक आहार सकस आणि पौष्टिक आहारामुळे स्तनाच्या कर्करोगाचा धोका टाळता येतो. यासाठी फळे, भाज्या, कडधान्य आणि प्रथिने यांचा आहारात समावेश करावा. प्रक्रिया केलेले आणि जास्त चरबीयुक्त पदार्थांचे सेवन कमी करावे. हे लठ्ठपणा आणि कोलेस्ट्रॉलला नियंत्रणात ठेवण्यास मदत करतात.

# निवडणुकांत आचारसंहितेचे उल्लंघन अयोग्य!

शिष्टाचारांच्या माध्यमातून समाजातील वरिष्ठ व कनिष्ठ यांच्यातील परस्परसंबंधांना समाजमान्यता व पुष्टी प्राप्त होते. त्याचप्रमाणे समाजातील वेगवेगळ्या स्तरांमधील सामाजिक अंतर टिकून राहते. शिष्टाचारांचे स्वरूप कृत्रिम भासत असले, तरी त्यांचा सामाजिक आशय महत्त्वाचा असतो. ज्या व्यवहारांमध्ये शिस्त व औपचारिकतेची निकड असते, तेथे शिष्टाचारांचे पालन काटेकोरपणे करण्यात येते. उदा. सैनिकी दलांत शिष्टाचार काटेकोरपणाने पाळण्याची गरज असते. उद्बोधक असा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर संकलित लेख... संपादक.

समाजातील सभ्यतापूर्ण व्यक्तिवर्तनाची प्रथा वा संकेत म्हणजे शालिनता- शिष्टाचार होय, असे सामान्यपणे म्हणता येईल. प्रत्येक समाजात शिष्टाचार आढळतो. मात्र प्रत्येक समाजातील शिष्टाचाराचे स्वरूप स्वतंत्र असते. समाजातील शिष्टजन-एलीट्स यांचा जो वर्ग असतो, त्याचे वर्तन किंवा आचार समाजातील इतर वर्गांना अनुकरणीय वाटतात. शिष्टाचाराच्या कल्पनेत असा एक अर्थ आहेच. एकाच समाजातील स्त्री-पुरुषांच्या विविध प्रकारच्या गटांत व्यावसायिक वर्गात किंवा इतर प्रकारच्या समूहातही विशिष्ट प्रकारचे शिष्टाचार रूढ असतात. समाजशास्त्रीय दृष्टीने व्यक्तीचे सामाजिक वर्तन किंवा आचार नियंत्रित करण्याचे शिष्टाचार हे एक साधन असते. किंग्जली डेव्हिस या अमेरिकन समाजशास्त्रज्ञाच्या अभिप्रायानुसार शिष्टाचार हे विशिष्ट प्रकारचे लोकाचार होत. त्यांना सखोल अर्थ नसला, तरी सामाजिक संबंधांचे स्वरूप सुखावह व शिस्तबद्ध व्हावे, म्हणून त्यांचे पालन करण्यात येते. शिष्टाचार पाळण्याबाबत प्रत्येक व्यक्तीवर तिची जात, जमात, वर्ग, व्यवसाय इत्यादींचे दडपण असते. शिष्टाचार शिकणे व त्यांचे पालन करणे, या प्रक्रियांमुळे प्रत्येक व्यक्तीचा दर्जा, भूमिका व प्रतिष्ठा यांबाबतचे महत्त्वपूर्ण संकेत स्पष्ट होतात. शिष्टाचारांचे उल्लंघन केल्यास समाजाचा रोष व टीका ओढवून घेण्याचा धोका व बहिष्कृत होण्याची भीती असते. समाजातील श्रेणीव्यवस्थाही शिष्टाचारांतून सूचित होते. शिष्टाचारांमुळे व्यक्तीला विशिष्ट समूहातील सदस्य असल्याची जाणीव होऊन तिची अस्मिता जागृत होते.

राष्ट्रीय दिन दिनदर्शिका- नॅशनल डे कॅलेंडरमधील रजिस्ट्रारने दरवर्षी १४ मे रोजी राष्ट्रीय शालीनता दिन अर्थात राष्ट्रीय शिष्टाचार दिन घोषित केला आहे. शिष्टाचारांच्या माध्यमातून समाजातील वरिष्ठ व कनिष्ठ यांच्यातील परस्परसंबंधांना समाजमान्यता व पुष्टी प्राप्त होते. त्याचप्रमाणे समाजातील वेगवेगळ्या स्तरांमधील सामाजिक अंतर टिकून राहते. शिष्टाचारांचे स्वरूप कृत्रिम भासत असले, तरी त्यांचा सामाजिक आशय महत्त्वाचा असतो. ज्या व्यवहारांमध्ये शिस्त व औपचारिकतेची निकड असते, तेथे शिष्टाचारांचे पालन काटेकोरपणे करण्यात येते. उदा. सैनिकी दलांत शिष्टाचार काटेकोरपणाने पाळण्याची गरज असते.

मध्ययुगीन यूरोपीय समाजामध्ये शिष्टाचारांचे स्तोम माजले होते. एमिली पोस्ट या प्रतिष्ठित घराण्यातील स्त्रीने सामाजिक आंतरसंबंधांमध्ये परस्परांचा आदर केला जावा, यासाठी कोणते शिष्टाचार अंगी बाणवावे, असे सांगितले आहे. भारतीय समाजातील विविध वर्ग, जाती, जमाती, धार्मिक संप्रदाय व पंथ यांच्या वर्तनांवर कठोर बंधने होती. विशेषतः स्त्री व पुरुषांमधील परस्परसंबंधांचे शिष्टाचार पाळणे अत्यावश्यक समजले जाई. उच्चवर्गीय स्त्रियांच्या बाबतीत निर्बंध अधिक कडक असत. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक परिवर्तनाला गती लाभून वर्ग, जात, जमात यांमधील पारंपरिक अंतर कमी झाले. प्रत्येक व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीचा मान ठेवून व अधिकारांची जाणीव राखून कसे वर्तन करावे, याबद्दल माणसाने नेहमी जागरूक असले पाहिजे. विसाव्या शतकातच राजकारण, धर्म व लष्करांसारखी क्षेत्रे सोडता, सर्वसामान्य व्यक्तीवरील सर्वच पारंपरिक वर्तनप्रकारांची दडपणे हळूहळू कमी होत गेली. आधुनिक समाजात व्यक्तिस्वातंत्र्य, वैयक्तिक हक्क, सामाजिक समता व न्याय यांसारख्या मूल्यांना महत्त्व प्राप्त झाले. लोकशाही समाजात वर्तनपद्धती कालबाह्य होत गेल्या. परंपरागत शिष्टाचारांचा प्रभावही कमी होत गेला. अर्थात नवे शिष्टाचारही याबरोबरच रूढ होत आहेत, हेही खरे. त्यातून व्यक्तीच्या सामाजिक व्यवहारातील वर्तनासंबंधीचे काही प्रतीकात्मक संदर्भ टिकून राहिले आहेत.

भारतात आपण पिळवणूकीच्या अर्थकारणात बांधलो गेलो आहोत, तेथून जेव्हा सर्वांची सुटका होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने आपला देश स्वतंत्र होईल. पिळवणुकीचे अर्थकारण राज्यकर्त्यांपासून सुरु होते. पोलिस, आयकर, अबकारी, कर, सीमाशुल्क आदी विभागात ठराविक जागी बदली होण्यासाठी लाख रूपयांची राज्यकर्त्यांना लाच दिली जाते. जो पोलिस अधिकारी अथवा आयकर आधिकारी एवढा खर्च करतो, त्याला त्याची वसुली करायची असते. त्यातूनच भ्रष्टाचाराचा उगम होतो. समाजाच्या वरच्या मजल्यावरून सुरू झालेला भ्रष्टाचार हळूहळू खाली पसरतो. जेव्हा सामान्य नागरिकांचा सरकारी यंत्रणेशी संबंध येतो तेव्हा प्रत्येक कागदासाठी त्याला किंमत मोजावी लागते. शाळा, इस्पितळे, व्यापार, अशा जीवनावश्यक सेवांमध्येही नागरिकांची पिळवणूक होते. हे अगदी योग्य शब्दांत भारतातील भ्रष्टाचाराचे विश्लेषण आहे. पिळवणुकीचे अर्थकारण राज्यकर्त्यांपासून सुरु होते, हे त्यांचे वक्तव्य अचूक आहे. आज निवडणुकांत आचारसंहिता लागू असूनही, मी निवडून आलो पाहिजे म्हणून उमेदवार मतदारांना पैशांच्या रूपात लाच देत आहेत, कपडेलत्ते, अन्नधान्याचे मोफत वाटप करीत आहेत. सध्या राज्यातच नव्हे तर अवघ्या देशात गाजत असलेला आदर्श इमारतीचा घोटाळा याचे मूर्तीमंत उदाहरण ठरावे. एक आजी, दोन माजी मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, राज्य मंत्री असे कितीतरी राजकीय नेते या घटाळ्यात अडकले आहेत. जर मंत्री एवढे खोलवर रुतले असतील तर सनदी अधिकारी व इतर वेगवेगळ्या प्रशासकीय विभागाचे कितीतरी अधिकारी अडकले असतील. राष्ट्र वा राज्य चालविणारे प्रतिनिधी जर भ्रष्टाचारी निघाले तर अधिकारी वर्ग मागे कसा राहील? हे दुष्टचक्र खूपच दुर्दैवी आहे. जणू भ्रष्टाचारच हा शिष्टाचार झाला आहे, असे वाटते; नाही का? !! राष्ट्रीय शिष्टाचार दिनाच्या सर्व भावाबहिणींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

*******

- संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.
द्वारा- श्रीगुरुदेव प्रार्थना मंदिराजवळ,
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.

# हात आणि पाय दुखीपासून मिळेल आराम, फक्त करा 'या' योगासनांचा सराव

सध्याची चुकीची जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या सवयींमुळे पोषक घटकांचा अभाव निर्माण होतो. यामुळे अनेक लोकांना शारीरिक समस्यांना सामोरे जावे लागते. व्यस्त जीवनशैलीमुळे आरोग्याकडे लक्ष देऊ शकत नाही. यामुळे अनेक लोकांना हात आणि पाय दुखण्याची समस्या जाणवते. या समस्या कमी करण्यासाठी पुढील योगासनांचा सराव करू शकता.



बालासन बालासनालाच बाल मुद्रा म्हणतात. हा योग नियमितपणे केल्यास शरीराच्या वेदना कमी होतात. हा योग करण्यासाठी सर्वात आधी वज्रासनात बसावे. नंतर श्वास घेताना आपले दोन्ही हात डोक्याच्या वर सरळ करावे. नंतर श्वास सोडा आणि पुढे वाकवा. तळवे आणि डोके जमिनीवर ठेवून दीर्घ श्वास घ्या आणि श्वास सोडा. आता तुमच्या दोन्ही हातांची बोटे एकत्र करा आणि हळूवारपणे दोन्ही तळहातांमध्ये डोके ठेवा. काही काळ या स्थितीत रहा आणि नंतर पुर्वस्थितीत यावे.

भुजंगासन भुजंगासन केल्याने पाय आणि हात दुखणे कमी होऊ शकते. हा योग करण्यासाठी सर्वात आधी पोटावर जमिनीवर झोपावे. दोन्ही पायांमध्ये थोडे अंतर ठेवा आणि दीर्घ श्वास घ्या आणि कंबरेचा वरचा भाग वरच्या बाजूला घ्या. यादरम्यान, कोपर सरळ ठेवा आणि पाय वाकवताना जास्त ताणू नका.

सेतुबंधासन पाय आणि पाठदुखीपासून आराम मिळवण्यासाठी सेतुबंधासन फायदेशीर आहे. हा योग केल्याने पायांच्या स्नायूंमध्ये रक्ताभिसरण वाढते. त्यामुळे पायांचे दुखणे बरे होऊ लागते. सेतुबंधासन करण्यासाठी आधी पाठीवर झोपावे. नंतर तुमचे पाय खांद्याच्या रुंदीला वेगळे ठेवा आणि तुमचे गुडघे वाकवा. तळवे उघडा आणि हात जमिनीवर सरळ ठेवा. श्वास घेताना कंबर वर उचलून खांदे व डोके सपाट जमिनीवर ठेवा. नंतर, श्वास सोडताना, पुर्वस्थितीत परत या.

उत्तानासन उत्तानासन योग केल्याने पाय दुखणे आणि जडपणा या समस्यांपासून आराम मिळतो. हा योग कंबर आणि मणक्यासाठीही फायदेशीर आहे. हा योग करण्यासाठी, सर्वात आधी गुडघे सरळ ठेवा, पाय नितंब-रुंदी वेगळे ठेवा आणि पुढे वाकून पायांच्या मागील भागाला स्पर्श करण्याचा प्रयत्न करा.

# काँग्रेसचे भवितव्य काय?

काँग्रेसच्या नेतृत्वाखाली यूपीए सत्तेत होती, तोपर्यंत सर्व काही दबलेले होते. सत्ता गेल्यानंतर गेल्या दहा वर्षांत १५ माजी मुख्यमंत्री पक्ष सोडून निघून गेले. याबाबत काँग्रेस पक्षनेतृत्व गांभीर्याने विचार करणार की नाही, पक्षात परिवर्तन घडवणार की नाही यावर या पक्षाची पुढील वाटचाल आणि दिशा अवलंबून आहे.

निवडणुकीच्या काळात पक्ष सोडणे आणि उमेदवारांनी कोणत्या ना कोणत्या कारणांनी निवडणूक लढण्यास नकार देणे ही बाब सामान्य असली तरी काँग्रेस पक्षासाठी मात्र निराशाजनक आणि राजकीय अस्तित्वाच्या संकटाचे संकेत देणारी आहे. वास्तविक काँग्रेस पक्ष लोकसभेत स्वबळावर ८० ते १०० जागा जिंकत असेल तर सध्याच्या प्रतिकूल वातावरणात ही एकप्रकारे संजीवनी ठरू शकते. येत्या चार जूनला भाजपला २७२ जागांच्या अलीकडे रोखण्यात काँग्रेसने यश मिळवले तर हा पक्ष पुढच्या लढाईसाठी जिवंत राहील. यानुसार गेल्या काही दिवसांपासून काँग्रेस संपली असे म्हणणार्या लोकांसाठी काँग्रेस अजूनही जिवंत असणे आणि सक्रिय राहणे ही एकप्रकारे बातमीच असेल.काँग्रेसचे संकटग्रस्त आणि दृढनिश्चियी नेते राहुल गांधी यांच्यासाठी ही निवडणूक अतिशय महत्त्वाची आहे. दोन भारत जोडो यात्रेचे पाठबळ त्यांना लाभले आहे. यातच संसदीय जागा राखण्यासाठी वायनाड येथून निवडणूक लढत असताना रायबरेली येथे अर्ज दाखल करत मित्रांना आणि राजकीय शत्रूंना हैराण केले. दोन जागांवर लढणारे ते एकमेव काँग्रेस नेते आहेत. राहुल गांधी यांनी अमेठीतून निवडणूक न लढण्याच्या निर्णयाबाबत बरेच लिहिले गेले. या ठिकाणी २०१९ मध्ये त्यांचा पराभव झाला होता. त्यामुळे यंदा त्यांना ही निवडणूक पुन्हा एकदा राहुल विरुद्ध इराणी अशी करायची नव्हती. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे अजूनही राहुल आणि काँग्रेस पक्ष हा २०२४ च्या लोकसभा निवडणुकीकडे राहुल विरुद्ध नरेंद्र मोदी अशा दृष्टीने पाहात आहे. खोलवर गेल्यास राहुल गांधी यांच्यावर उत्तर प्रदेशातून निवडणूक लढण्यासाठी समाजवादी पक्षाचा प्रचंड दबाव होता. उत्तर प्रदेशातील ३४ लोकसभा जागांवर 'इंडिया' आघाडीची ४० टक्क्यांपेक्षा अधिक मते आहेत. दुसर्या भाषेत सांगायचे झाल्यास या जागांवर काँग्रेस आणि समाजवादी पक्षाला संयुक्तपणे ताबा मिळवता येऊ शकतो. परंतु समाजवादी पक्ष आणि काँग्रेस यांची आघाडी देशातील या सर्वांत मोठ्या राज्यात ३४ जागांवर भाजपचा वारू रोखू शकते का? याचे उत्तर सद्य:स्थितीत तरी नकारार्थी आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रोड शो करणे आणि अयोध्येतील राम मंदिराचा दौरा करणे याचा अर्थ भाजप हे राहुल आणि अखिलेश यांच्याकडे संभाव्य धोका म्हणून पाहात आहे असा होतो. अर्थात बसपा आणि मायावती यांचा उत्तर प्रदेशात भाजपला मोठा आधार लाभणार आहे. परंतु कर्नाटक विधानसभा निवडणुकांमध्ये ज्याप्रमाणे जनता दलाची मते काँग्रेसकडे वळली होती, तशा प्रकारे यदाकदाचित बसपाची मते ही 'इंडिया' आघाडीकडे गेल्यास भाजपसाठी उत्तर प्रदेशात मोठे संकट निर्माण होऊ शकते.

काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी दिलेले राधिका खेडा, अरविंदर सिंह लवली, गौरव वल्लभ, रोहन गुप्ता, सुरेश पचौरी, अक्षय कांती बाम, वीरेंद्र सिंह, संजय निरुपम हे नेते राजकीय पातळीवर सक्षम नसले तरी त्यांच्यात एक साम्य आढळते. यापैकी अनेक नेत्यांनी राम मंदिर आणि प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात सामील होण्यास काँग्रेसने दिलेल्या नकाराला आक्षेप घेतला होता. अर्थात काँग्रेस आपल्या नेत्यांना अयोध्येला जाण्यापासून अडवत नव्हती. २२ जानेवारी रोजी काँग्रेस पक्ष हा कोणत्या ना कोणत्या रूपातून मोदी आणि भाजपसमवेतच होता. म्हणूनच अजय राय, दीपेंद्र हुड्डा आणि मंदिरात जाणार्या अन्य लोकांना लोकसभेचे तिकीट देण्यात आले. पण तरीही यावेळी पक्षातील असंतुष्ट आणि बंडखोरांनी कोणत्या ना कोणत्या कारणांचा दाखला देत पक्ष सोडला. यामुळे काँग्रेसला अस्वस्थतेचा आणि लाजिरवाण्या स्थितीचा सामना करावा लागत आहे. सुरत येथे भाजपचे उमेदवार बिनविरोध विजयी झाले तर इंदोर, पुरी, अहमदाबाद पूर्व या ठिकाणी भाजपचा मुकाबला करण्यासाठी काँग्रेसच्या उमेदवारांनी असमर्थता दर्शवली. ही स्थिती भीषण आहे. तूर्त काँग्रेसाठी चांगली बातमी म्हणजे आता यापेक्षा स्थिती अधिक बिघडणार नाही. १९६७, १९७७, १९९६, १९९८-१९९९ च्या तुलनेत २०१४ आणि २०१९ मध्ये काँग्रेसला लाजिरवाणा पराभव पत्करावा लागला असतानाही कोणतीही फाटाफूट झाली नव्हती आणि काँग्रेसमधून फुटून बाहेर पडत कोणी वेगळा पक्षही स्थापन केला नाही. तरीही सातत्याने नेत्यांनी पक्ष सोडण्याचे सत्र सुरू राहिल्याने काँग्रेसला प्रचंड राजकीय नुकसान सहन करावे लागले. १९६९ आणि १९७८ च्या इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळाच्या तुलनेत सध्याच्या काँग्रेस नेतृत्वाला राजकीय स्पर्धकांचा मुकाबला करण्यासाठी नव्याने संघटना उभारणीसाठी आणि संघटनाबांधणी करण्यासाठी वेळ मिळत नसल्याचे चित्र आहे.

# मांडवी वनपरिक्षेत्रात बोगस. तारजाळी कुंपणाचा धडाका!

मांडवी वन विभागात तारा जाळी कुंपणाचे काम निकृष्ट दर्जा : सुरू असून ती तार जाळी कुंपण नकाशावरील हद्द न पाहता अनिल ठिकाणी वन विभागाची जमीन ही मालकी भागाकडे सोडून अलीकडूनच तार जाळी कुपन अंदाज पंचे सुरू आहे. वनविभागाची मालकीची जमीन बेकायदेशीररित्या अनेकांच्या ताब्यात गेली आहे. यावर संबंधित वन अधिकारी मौन बाळगून आहे.




किनवट .प्रतिनिधी (शेख शौकत) गेल्या दोन वर्षापासून तार जाळीचे कुंपण उभारण्याचे काम मांडवी वनपरिक्षेत्रात अनेक बिटातील वन हद्दीवर झपाट्याने सुरू आहे तर या तार जाळीचे सिमेंट खांब निकृष्ट दर्जाचे असल्याने ते कोसळत असल्याचे चित्र समोर आले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, गेल्या दोन वर्षापासून मांडवी वनपरिक्षेत्रातील उनकेश्वर, सारखणी, मांडवी, पिंपळगाव या परिमंडळ अंतर्गत येत असलेल्या अनेक बिटात ज्या भागात पूर्वी रोपवन झालेले आहे अशा वनविभागाच्या सीमा हादीवरून तार जाळीचे कुंपण गुत्तेदारांमार्फत मोठ्या प्रमाणात सुरू आहे. सदर तारजाळीच्या कुंपणामध्ये मोठ्या प्रमाणात अनिमितता असून तारजाळीच्या सिमेंट खांबाचे दराची खोली ही अर्ध्या फुटावर खोदल्या गेली आहे तसेच हे खांब रोवताना दरामध्ये टाकलेले सिमेंट कॉंक्रेटही वरवर टाकून त्यावर क्युरिंगही केल्या गेली नाही.

आणि या जाळीसाठी लागणारे सिमेंटचे खांबही घिसड घाईने क्युरिंग कमी करून निकृष्ट दर्जाचे केल्याने पिंपळशेंडा, उनकेश्वर च्यास बीटातील सदर तार जाळी कुंपणाचे शेकडो खांबे तुटून खाली पडली आहे. असेच निकृष्ट दर्जाचे तारजाळी चे कुंपण इतर बीटातही मोठ्या प्रमाणात करण्यात आले आहे. तार जाळी व सिमेंट खांब त्याला आवरून धरणारे खिळे सुद्धा कमजोर लावण्यात आले आहे. अशा या निकृष्ट दर्जाच्या तारजाळीच्या कुंपणाला संबंधित वनाधिकाऱ्यांची सुद्धा मूक संमती असून त्याचे बिलही मोठ्या प्रमाणात अदा करण्यात आले आहे. पण या सर्व प्रकाराचे कुणालाही सोयरसुतुक नसून वरिष्ठ अधिकारी सुद्धा याकडे लक्ष द्यायला तयार नाही कोट्यावधी रुपये खर्च होऊ नये तार जाळीचे कुंपण निकृष्ट दर्जाचे होत असेल तर या जाळी कुंपणाचा काय उपयोग? असा प्रश्न उपस्थित होत आहे. तेव्हा या निकृष्ट जाळी प्रकरणी नांदेडचे उपवनसंरक्षक वाभळे यांनी जातीने लक्ष देणे गरजेचे आहे.

# भंडारी बंधुंचे सुमारे २०० कोटींचे ‘भंडार’ जप्त

नांदेड : प्रतिनिधी आयकर विभागाच्या पथकाने नांदेड शहरातील भंडारी बंधूंच्या निवासस्थानासह फायनान्स सेवा पुरवणा-या शाखांवरही धाड टाकून सोने, हिरे व रोकड असा सुमारे २०० कोटींच्या जवळपास ऐवज हाती लागला आहे. ऐन अक्षय्य तृतीयेच्या दिवशी टाकण्यात आलेल्या धाडीनंतर जवळपास चार दिवस संपत्तीची मोजदाद सुरू होती.

आयकर विभागाच्या नाशिकसह छत्रपती सभांजीनगर येथील आयकर विभागातील जवळपास ९० अधिकारी व कर्मचा-यांचा फौजफाटा अक्षय तृतीयेच्या पहाटे भंडारी बंधूंच्या निवासस्थानी धडकला. २५ ते ३० वाहनांमध्ये आलेल्या या अधिकारी व कर्मचा-यांनी प्रारंभीच सगळ्यांकडील मोबाईल जप्त करत घराच्या झाडाझडतीला सुरूवात केली होती. प्रारंभी घराची झाडाझडती सुरू केल्यानंतर काही अधिका-यांनी भंडारी यांच्या अलीभाई टॉवर व कोकाटे कॉम्प्लेक्स येथील शाखांवर छापे टाकले.




गेल्या चार दिवसांपासून निवासस्थान व कार्यालयातील नोंदींची तपासणी करण्यात येत होती. भंडारी कुटूंबियांच्या विविध ७ आस्थापना आहेत. त्यामध्ये सापडलेल्या कागदपत्रे, हार्डडिस्क, पेन ड्राईव्ह व रजिस्टरमधील नोंदीनुसार भंडारी कुटूंबियांकडे १७० कोटी रुपये किंमतीची संपत्ती आहे. तपासणीत त्यांच्या घरात १४ कोटी रुपये रोख, ८ किलो सोन्या -चांदीची दागिणे आणि सोन्याची बिस्कीटे असा ५ कोटी ६० लाख रुपयांचा ऐवज सापडला आहे. सोबतच काही हिरेही जप्त करण्यात आली आहेत. त्याचे मूल्यमापन तज्ज्ञ पारखींकडून करण्यात येत आहे. लोखंडी कपाटे, गाद्यांमध्ये भरून ठेवलेली रक्कम मोजण्यासाठी स्थानिक बँकेतील १५ कर्मचा-यांना पाचारण करण्यात आले होते. तसेच काही ठिकाणी खुले भूखंड असल्याची कागदपत्रेही हाती लागली आहेत.

कारवाईकडे नांदेडकरांचे लक्ष

जवळपास चार दिवसांपासून सुरू असलेल्या या कारवाईत सापडलेल्या ऐवजाचे मूल्यमापन करण्याचे काम मंगळवारी सकाळी पूर्ण झाल्यानंतर २०० कोटींच्या घरात संपूर्ण मालमत्ता असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या कारवाईमध्ये नेमकी भंडारी यांनी किती कर चुकवला अथवा त्यांच्यावर कोणती दंडात्मक कारवाई करण्यात आली याची अधिकृत माहिती अजूनही समोर आली नाही.

# होर्डिंग लावणाऱ्यांनी स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी रिपोर्ट सादर करावेत मनपाची परवानगी घेवूनच इमारतीवर फलक लावावेत मनपाच्या सूचना

लातूर/प्रतिनिधी : शहरात होर्डिंग लावणाऱ्या एजन्सीनी आपल्या होर्डिंगची अनुभवी संरचना अभियंत्यामार्फत तपासणी करून होर्डिंग सुस्थितीत असल्याबाबतचे संरचना मजबुती प्रमाणपत्र ( स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी ) तात्काळ सादर करावे, अशा सूचना मनपाच्या वतीने देण्यात आल्या आहेत.

सोमवारी मुंबईत वादळी वाऱ्यामुळे होर्डिंग कोसळून झालेल्या अपघातात १४ जणांचा मृत्यू झाला.सद्यस्थितीत वादळी वारा,पाऊस व विजेमुळे फलक कोसळून अपघाताच्या घटना घडू शकतात.त्याअनुषंगाने संबंधित एजन्सीनी आपल्या होर्डिंगची डागडुजी करून घ्यावी. तसेच होर्डिंग सुस्थितीत असल्याबाबतचे संरचना अभियंत्याचे प्रमाणपत्र मनपाकडे सादर करावे, असे मनपाने कळविले आहे.

शहरात अनेक मालमत्तांवर,मोठ्या इमारतींवर जाहिरात फलक लावलेले दिसतात. मालमत्ताधारकांनी फलक लावण्यास परवानगी देताना संबंधिताकडे स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी प्रमाणपत्र व मनपाची परवानगी असेल तरच आपल्या इमारतीवर होर्डिंग लावण्यास परवानगी द्यावी. विनापरवाना होर्डिंग लावल्याचे आढळून आल्यास कार्यवाही करण्याचा इशाराही मनपाच्या वतीने देण्यात आला आहे.

मनपा हद्दीतील सर्व खाजगी व सार्वजनिक मालमत्ताधारकांनी आपल्या इमारतीवर अनधिकृत होर्डिंग लावलेले असेल तर ते तात्काळ काढून घ्यावे अन्यथा गुन्हा नोंद करण्यात येईल,असा इशाराही मनपाच्या वतीने देण्यात आला आहे. अशा होर्डिंगमुळे भविष्यात अपघात किंवा दुर्घटना होऊन जीवित व वित्तहानी झाली तर त्यासाठी संबंधित एजन्सीस जबाबदार धरून सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येईल,असा इशाराही मनपाकडून देण्यात आला आहे.

# शहरातील होर्डिंग काढून मोठ्या होर्डिंग वर कायमस्वरूपी बंदी आणण्याची मागणी


लातूर :--- वादळी पावसाची शक्यता नाकारता येत नसल्याने नागरिकांचे सुरक्षेसाठी लातूर शहरातील इमारती,दुभाजक , विविध चौकातील मोठे हिर्डिंग तात्काळ काढून मोठ्या होर्डिंग वर कायची बंदी आणण्याच्या मागणीचे आज लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या वतीने महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आले निवेदनात पुढील काळात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता नाकारता येत नाही शहरात इमारतीवर,दुभाजकात,विविध चौकात जाहिरातीचे मोठं मोठे होर्डिंग लावण्यात आले आहेत सदरील होर्डिंगची सुरक्षा , परवाने लातूर शहर महानगरपालिकेने तपासून तात्काळ अनधिकृत होर्डिंग काढून मोठे सर्वच होर्डिंग काढून मोठ्या होर्डिंग लावण्यावर बंदी आणण्याची नमूद करण्यात आले निवेदनावर समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे, शंकर जाधव,बाबासाहेब बनसोडे ,गौतम ससाणे, भगवेश्वर धनगर इत्यादींच्या स्वाक्षऱ्या होत्या

# बाभळगाव येथील बाळू सोनकांबळे यांचा विजेचा शॉक लागून दुदैवी मृत्यू

लातूर/प्रतिनिधी:-महावितरण उपकेंद्र, बाभळगाव येथे लाईटच्या ताराला चिटकून गावातील तरुण बाळू सोनकांबळे यांचा विजेचा शॉक लागून दुदैवी मृत्यू झाला. या घटनेची माहीती मिळताच राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी अपघाताची माहीती घेतली, सोनकांबळे कुंटूबियातील या दुदैवी घटने बददल दु:ख व्यक्त केले. सोनकांबळे कुंटूबियाना शासनाकडून जास्तीत जास्त आणि लवकरात लवकर आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. तसेच या घटनेला जबाबदार असलेल्या व कामात हलगर्जीपणा करणाऱ्या महावितरण कर्मचाऱ्यांची चौकशी करण्याच्या सुचना संबंधित विभागाला दिल्या आहेत. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री आणि लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी महावितरण उपकेंद्र, बाभळगाव येथे लाईटच्या ताराला चिटकून बाळू सोनकांबळे यांचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाला. त्यांच्या कुटूंबीयाना शासनाकडून कुटुंबियांना जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. तसेच येणाऱ्या पावसाळी अधिवेशनात हा मुददा सरकार समोर मांडणार असल्याचे सांगीतले आहे.

# खत दरवाढीच्या अफवेने शेतकऱ्यांत खळबळ

पंढरपूर : एककडे लोकसभा निवडणुकांच्या रणधुमाळी तर दुसरीकडे ऐन निवडणूकीत रासायनिक खतांच्या दरवाडीची जोरदार अफवा जिल्ह्यासह राज्यभर पसरली त्यामुळे शेतकऱ्यांतून सरकार विषयी गैरसमज पसरला यामुळे हैराण झालेल्या खत उद्योगाने दरवाढ झाली नसल्याचा स्पष्ट निर्वाळा दिला आहे. तर कोणत्याही रासायनिक खताच्या किंमतीत दर वाढ झाली नसून खत दुकानदारानी शेतकऱ्यांकडून जादा दर घेतल्यास कडक कारवाईचा इशारा सोलापूर कृषी विभागाने दिला आहे.सोलापूर जिल्ह्यात निवडणूक प्रचाराच्या रणधुमाळीत शेतकयांच्या प्रश्नांवर सध्या घमासान चर्चा होते आहे. कृषी निविष्टांवरील खर्च वाढल्याचाही मुद्दा समूह माध्यमांवर सतत उपस्थित होतो आहे. त्याचे निमित्त साधत ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर खते महागली आहेत अशी जोरदार अफवा राज्यभर पसरली होती, विशेष म्हणजे काही वृत्तवाहिन्यांनी ही अफवा खरी समजून खत दरवाढीच्या बातम्या प्रसारित केल्या. त्यामुळे राज्यभर गोंधळ उडाला. या बातम्यांमध्ये १०:२६:२६ खताच्या ५० किलोच्या गोणीचे दर १४७० रुपयांऐवजी १७०० रुपये, २४:२४:०:० श्रेणीचे दर १५५० रुपयाऐवजी १७०० रुपये २०:२०:०:० थी किंमत १२५० स्पयऐविजी १४५० रुपये तर सिंगल सुपर फॉस्पेटण्या किमतीत ५०० रुपयांवरून ६०० रुपयांपर्यंत वाढ झाल्याचे चुकीचे सांगण्यात आले. या बातम्यांना खरे मानत काही भागात विक्रेत्यांनी अडवणूकदेखील सुरू केल्याचे शेतकर्यांनी सांगितले.दरम्यान, खत दर वाढीच्या अश्या खोट्या बातम्या कश्या पसरविल्या जातात हे कळत नाही. शेतकरी बांधवांनी याबाबतीत विश्वास ठेवू नये. आमच्या विभागाकडे तसे अधिकृत पत्र आलेले नाही. त्यामुळे खतांच्या दरात वाढ झालेली नाही. जर वाढ झालेली नसताना कोणी शेतकऱ्यांकडून अधिक पैसे घेत असल्यास तक्रारी कराव्यात, निश्चीत कारवाई केली जाईल असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गवसाने म्हणाले.कृषी आयुक्तालयात दरवाढीची अफवा धडकताच स्वतः गुणनियंत्रण संचालक विकास पाटील यांनी खत उद्योगातील उच्चपदस्थ अधिकार्यांशी चर्चा केली. त्यात कोणतीही दरवाढ झालेली नसून उलट आरसीएफ कंपनीच्या एका श्रेणीची किंमत कमी झाल्याचे आयुक्तालयाच्या निदर्शनास आले. आरसीएफ कंपनीचे उपमहाव्यवस्थापक भगवानसिंह चौहान यांनी दिलेल्या लेखी पत्रात खतांचे दर नमूद केले. त्यात आरसीएफ युरियाची कमाल किरकोळ किंमत (एमआरपी) २६६.५० रुपये (४५ किलो गोणीसाठी) तर ५० किलोची सुफला १५:१५:१५ ची किंमत १४०० रुपये, १०:२६:२६ ची किंमत १०७० रुपये तर डीएपीची किंमत १३५० रुपये अशी नेहमीप्रमाणेच स्थिर असल्याचे कळविण्यात आले.



निवडणुकीच्या वातावरणाची संधी साधत खत दरवाढीची अफवा पसरवली गेली असू शकते, असे ‘फर्टिलायझर्स असोसिएशन ऑफ इंडिया च्या सूत्रांनी सांगितले आहे. राज्यात कोणत्याही कंपनीने खतांची दरवाढ केलेली नाही. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना या अफवेचा फटका बसू शकतो. मुळात केंद्र शासनाने अन्नद्रव्य आधारीत अनुदान (एनबीएस) अलीकडेच जाहीर केले आहे. त्यानुसार खत निर्मिती कंपन्या आपापल्या उत्पादनाचा निर्मिती खर्च आणि किमतीचे पुढील किमान सहा महिन्यांचे नियोजन करीत आहे. त्यामुळे मधेच खताची दरवाढ होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तर आंतरराष्ट्रीय बाजारात खतांच्या कच्च्या मालाचे दर अचानक वाढल्यास कंपन्यांना खतांच्या किमतीचा आढावा घ्यावा लागतो. मात्र त्यासाठी देखील केंद्राची परवानगी घ्यावी लागते. सध्या आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या मालाबाबत मोठे बदल झालेले नाहीत. त्यामुळे सध्या खतांच्या किमती स्थिर आहेत, असेही असोसिएशनच्या सूत्रांनी स्पष्ट केले. उलट २०:२०:०:१३ खताची नव्या पुरवठ्याची किंमत १३०० रुपयांऐवजी १२५० रुपये झाली आहे. त्यामुळे या श्रेणीचे नवे खत शेतकऱ्यांना प्रतिगोणी ५० रुपये कमी दराने मिळणार आहे, असा खुलासाही करण्यात येत आहे. खत निर्माण करणाऱ्या कंपन्या वरिष्ठ कार्यालयाकडून आम्ही खात्री केली आहे. रासायनिक खतांच्या किमती वाढलेल्या नाहीत. शेतकरी विक्रेत्यांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. एमआरपीपेक्षा जास्त दराने विक्री होत असल्यास शेतकयांना कृषी विभागाशी त्वरित संपर्क करा कारवाई केली जाईल. असे निविष्ठा व गुणनियंत्रण अधिकारी धनंजय पाटील यांनी सांगीतले.

# ईपीएफओ खातेधारकांचा क्लेम आता अवघ्या चार दिवसांत निकाली निघणार

नवी दिल्ली : निवृत्तीनंतर आर्थिक चणचण भासू नये यासाठी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना अर्थात ईपीएफओच्या मदतीने दर महिन्याला काही रक्कम सेव्ह करतात. यालाच आपण पीएफ किंवा ईपीएफ म्हणतो. कर्मचा-यांनी गुंतवलेल्या या पैशांवर सरकार एफडीप्रमाणे व्याज देते. तसेच कर्मचा-यांनी गुंतवलेला हा पैसा बुडण्याची भीती नसते. तो सुरक्षित असतो. दरम्यान, जमा केलेल्या पीएफमधील काही निधी आपत्कालीन स्थितीत काढता येतो. याच आपत्कालीन निधी काढण्याच्या प्रक्रियेसंदर्भात केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे.केंद्र सरकारच्या नव्या निर्णयामुळे ईपीएफओ खातेधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयाअंतर्गत खातेधारकांनी केलेले वेगवेगळे क्लेम ऑटोमॅटिक प्रणालीने मार्गी लावले जाणार आहेत. ईपीएफओ खातेधारक शिक्षण, लग्न, घरखरेदी, घरबांधणी यासाठी पीएफ खात्यातील पैसे काढू शकतात. त्यासाठी खातेधारकाला क्लेम करावा लागतो. याच क्लेमची संपूर्ण प्रक्रिया आता ऑटोमॅटिक झाली आहे. याबाबत कामगार मंत्रालयाने सविस्तर सांगितले आहे. कामगार मंत्रालयाच्या माहितीनुसार ईपीएफ योजना, १९५२ च्या कलम ६८ (शिक्षण आणि विवाह) तसेच ६८ बी (घरासाठी अॅडव्हानस पैसे) अंतर्गत करण्यात आलेले सर्व दावे ऑटो क्लेम सेटलमेंट फॅसिलिटीच्या मदतीने निकाली काढले जाणार आहेत. तीन दिवसांत क्लेम निकाली निघणार

याआधी कर्मचा-याने केलेला क्लेम निकाली काढण्यासाठी कमीत कमी दहा दिवस लागायचे. आता मात्र ऑटो क्लेम सेटलमेंट फॅसिलिटीमुळे अवघ्या तीन ते चार दिवसांत हे क्लेम निकाली




काढण्यात येतील. तीन ते चार दिवसांतच खातेधारकांचा क्लेन पूर्ण होईल आणि त्यांना त्यांच्या पीएफ खात्यातील रक्कम मिळेल. विशेष म्हणजे असे क्लेम निकाली काढताना कोणत्याही मानवाचा हस्तक्षेप होणार नाही. एप्रिल २०२० मध्ये चालू केली होती सुविधा

केंद्र सरकारने अशीच सुविधा करोना महोसाथीच्या काळात एप्रिल २०२० मध्ये चालू केली होती. तेव्हा आजारासंदर्भातील क्लेम लवकरात लवकर निकाली निघावेत आणि लोकांना उपचारासाठी पैशांची चणचण भासू नये म्हणून अशी सुविधा चालू करण्यात आली होती.

अॅडव्हान्स क्लेमची सीमा एक लाख रुपये

ईपीएफओने लोकांना दिलासा देणारा आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. आजाराच्या संदर्भात केलेल्या अॅडवान्स क्लेमची सीमा ही १,००००० रुपये करण्यात आली होती. अगोदर ही सीमा फक्त ५०,००० रुपये होती.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE